# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २१/०६/२०१७

## पोलीस अधिक्षक कार्यालयात योग दिवस उत्साहात साजरा

❖ *२१ जुन अंतराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधुन योग व प्राणायाम शिबीराचे आयोजन.*

आज दि. २१ जुन अंतराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधुन योग व प्राणायाम शिबीराचे आयोजन पोलीस मुख्यालय गडचिरोली येथील कवायत मैदान येथे करण्यात आले.

पोलीस कवायत मैदान गडचिरोली येथे २१ जुन अंतराष्ट्रीय योग दिन उत्साहात पार पडला असुन, पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग व प्राणायाम यांचे फायदे सांगण्यात आले. पोलीस कर्मचाऱ्यांचे दैनंदिन जीवनमान हे अतिशय ताण-तणाव व धकाधकीचे असते. कर्मचाऱ्यांचे ताण-तणाव कसे घालवता येईल व सकारात्मक दृष्टया जीवन आनंदाने कसे जगता येईल, या उद्देशातून पतंजली सेवासंस्थाचे योग प्रशिक्षक श्रीमती वर्षाताई देशमुख व सहकारी यांनी गडचिरोली पोलीस जवानांना योग व प्राणायामाचे प्रशिक्षण दिले.

योग दिवशी मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख सर, मा अपर पोलीस अधिक्षक महेद्र पंडीत, मा. अपर पोलीस अधिक्षक हरी बालाजी, पोलीस उप अधिक्षक नवनाथ ढवळे व उपविभागीय पोलीस अधिकारी सागर कवडे तसेच एस आर पी एफ व जिल्हा पोलीस यांचे अधिकारी व पोलीस जावानांनी उपस्थिती दर्शवली.

पोलीस विभागाकडुन मा. अपर पोलीस अधिक्षक महेद्र पंडीत यांनी पतंजली सेवा संस्थाचे योग प्रशिक्षक श्रीमती वर्षाताई देशमुख व सहकारी यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.